
R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



एकूण पाने १६ प्रती अंक ₹ ५

वर्ष ५३ वे, अंक ३रा, मुंबई मे २०२२ वार्षिक वर्गणी ₹ ५०

## मनोगत

**श्री. प्रभाकर पां. कुलकर्णी (कार्याध्यक्ष)**

साष्टांग नमस्कार,

कळविण्यास अत्यंत आनंद वाटतो की, मागील समाचारमध्ये केलेल्या आवाहनाला चांगला प्रतिसाद लाभत असून काही दानशूर व्यक्तीनी आपल्या समाजातील विद्याथी / विद्यार्थिनीना त्याच्या शिक्षणासाठी देणगी देण्याचे कबूल केले आहे.

संस्थेच्या प्रस्तावित सामाजिक उपक्रमांसंबंधी उत्स्फूर्त प्रतिसाद आम्हाला सभासदांकडून मिळत आहे व त्यांच्या विनंतीनुसार व माहितीसाठी आमच्या उपक्रमांची माहिती खालील प्रमाणे.

१. करोना काळामध्ये मृत्यू पावलेल्या पालकांच्या मुलाला/मुलीला दरवर्षी रु. ५०००/- प्रमाणे पुढील पाच वर्ष शैक्षणिक मदत

२. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण गरिब ५ कुटुंबाला म्हणजे ज्यांचे उत्पन्न रुपये १ लाख पेक्षा कमी असेल त्यांना त्यांच्या मुलीच्या लग्नासाठी प्रत्येकी रुपये १० हजार आर्थिक मदत


३. १०वी १२वी पदवी परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थी/विद्याथीनींना रुपये २५००/५००० शैक्षणिक मदत (गुणवत्ता आधारीत)

४. भारतात वा परदेशात उच्चशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या हुशार विद्यार्थी/विद्यार्थीनीस कर्जरूपी शिष्यवृत्ती योजना.

५. सभासदांसाठी सामूहिक वैद्यकीय विमा योजना राबविण्याचे ठरविले आहे. त्यानुसार जे सभासद या योजनेमध्ये भाग घेण्यास इच्छिूक आहेत त्यांनी त्यांची नावे, वय, पत्ता यासहित आम्हाला कळवावा.

अशा सर्व सभासदांची यादी आम्ही एकत्रित करून ऐच्छिक असलेल्या विमा कंपन्याकडून प्रस्ताव मागविणार आहोत. त्यानंतर आम्हाला हप्त्याची (प्रिमियम) माहिती मिळेल. यातील सुमारे १० ते ३० टक्केपर्यंतचा सहभाग संस्थेचा असेल. प्रायोगिक तत्त्वावर ही योजना यशस्वी झाल्यास त्याचा विस्तार भारतभर आपल्या सभासदांसाठी करण्याचा मानस आहे.

आम्हाला अनेक लोकांकडून समजले की, त्यांच्या गावात किंवा शहरात देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणांची संस्था




अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाची मुखपत्रिका

**समाचार**

वर्ष ५३वे, अंक ३रा, मे २०२२

(फक्त सभासदांसाठी)



**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष
**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष
**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह
**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष
**संपादक**
**श्री. प्रभाकर अ. संत**
**कार्यकारी संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
**मो. : ९८६७९९४३८९**

**अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही**

**आजीव सभासद वर्गणी ₹ ५००**

**प्रति अंक ₹ ५**



**दूरध्वनी :** २४३०२२७३, २४३०७५७३
**ई–मेल :** aadrbm@gmail.com
**संकेतस्थळ :** www.adrbmmahim.in


असल्याचे त्यांना ज्ञात नसते. कृपया याचा विचार करून सर्व सदस्यांनी संपर्क वाढवावा व आपले संघटन अधिक मजबूत करावे. यामुळे त्या संस्थांची सभासद संख्या व मध्यवर्ती मंडळाची सदस्य संख्या वाढवण्यास मदत होईल. तसेच अनेक नामवंत आपले समाज बांधव जे वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी समाजासाठी तसेच देशासाठी मोलाची कामगिरी बजावली आहे ते सर्वांसाठी परिचित होतील.

वरील सर्व उपक्रम राबविण्यासाठी संस्था समाजातील दानशूर व्यक्तींना आवाहन करत आहे की त्यांनी त्यांच्या देणग्या खाली दिलेल्या बँक खात्यात जमा कराव्यात.

| | |
|---|---|
| BANK NAME | THE COSMOSCO.OP.BANK LTD |
| A/C NO | 012204201005385 |
| IFSC Code | COSB0000012 |
| MICR Code | 400164002 |
| BRANCH | DADAR (W) |

आपल्या योग्य प्रतिसादाची वाट पाहात आहोत. ऐच्छिक सभासदांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

श्री. विलास विनायक जोशी, अध्यक्ष, ८६५२३६९२२२
श्री. प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी, कार्याध्यक्ष, ९८२०६१५८६
श्री. प्रसाद ठकार, सचिव, ९९३०७४८९३६
सौ. रोहिणी रामचंद्र तडवळकर, परिषद सचिव, ९४०३५००४८०
श्री. मिलिंद मल्हारराव सरदेशमुख, विश्वस्त, ९८६७९९४३८९

या संपर्क नंबरवर फोन करून आपण माहिती मिळवू शकता.

## ठळक घडामोडी

१) दि. २३ मार्च २०२२ : नाथषष्ठीचा कार्यक्रम डोंबिवली शाखे मार्फत संपन्न. संत एकनाथ महाराजांचे अभंग, जोगवा, गोंधळ, गवळणी या काव्यप्रकारांतून जनजागृती.

२) ऋग्वेदी ब्राह्मण संघ, डोंबिवली – सभागृहात मराठी भाषा दिन उत्साहात साजरा.

३) दे.रु.बा. संघ डोंबिवली शाखेचे विद्यमान विश्वस्त श्री. डी. डी. देशपांडे व त्यांच्या सुविद्य पत्नी यांनी ४ हजार कि.मी.ची नर्मदा परिक्रमा पूर्ण केली.

४) दे.रु.बा. संघ कल्याण शाखेचा २९वा वर्धापन दिन उत्साहात साजरा.

५) मध्यवर्ती मंडळ कार्यालयात शिवजयंती, नाथषष्ठी उत्साहात साजरी.

६) संस्थेचे सभासद श्री. माधव जोशी यांनी ठाणे येथील २१ कि.मी.ची हाफ मॅरेथॉन शर्यत २ तास ३ मिनिटे वेळेत पूर्ण केली.

७) कु. पूर्वा रावेकर, डोंबिवली हिला सी.ई.टी.मध्ये ९९.९९ गुण मिळवून, जीवशास्त्र या विषयात महाराष्ट्रात प्रथम. तिचे हार्दिक अभिनंदन!

# श्रीसमर्थ रामदासांनी श्री रामरायाकडे केलेली प्रार्थना (कोमल वाचा दे रे राम) भाग - २

**स. भ. श्री. मोहनबुवा रामदासी**

करुणाष्टकात रामरायाकडे मागताना समर्थांनी जे मागितले आहे त्याचा थोडक्यात आढावा घेऊ या.

कोमल वाचा दे रे राम ।। विमल करणी दे रे राम ।।

कोमल याचा अर्थ मलरहित. आपल्या वाणीतून निघालेला विचार आणि उच्चार मलरहीत म्हणजे विषयरहीत असावा. शुद्ध कोमलता त्यामध्ये असावी. वाणी तर ईश्वरानेच दिलेली आहे पण आपल्याला त्या वाणीवर कोमलता आणि विमलता यांचा संस्कार करायचा आहे. समर्थांना तर लोकसंग्रह साधायचा होता. त्या अस्मानी - सुलतानीच्या कालखंडामध्ये समाजाची मने जिंकायची होती. भिक्षेच्या माध्यमातून घराघरातील परिस्थितीचे अवलोकन करायचे होते.

प्रत्यही मागणे भिक्षा । मिळाली न मिळो तरी ।<br>
नित्य नूतन हिंडावे । धुंडावे भक्त प्रेमळ ।।<br>
कुग्रामे अथवा नगरे । पहावी घरांची घरे ।<br>
भिक्षामिसे लहानथोरे । परिक्षुनी सोडवावी ।।

समर्थांचे भिक्षविषयक विचार पाहिले कि भिक्षा हे जनसंपर्काचे प्रभावी माध्यम आहे हे जाणवते. जनसंपर्कासाठी वाणी मृदू असावी लागते. आर्जव / ऋजुता ही मृदू आणि मधूर वाणीतून व्यक्त होते.

उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा । शब्द निवडून बोलावा ।<br>
आपल्या पुरुषार्थ वैभवे । बहूतास सुखी करावे ।<br>
परंतु दुःखी करावे । हे राक्षसी क्रिया ।।

जगामध्ये जगमित्र । जिव्हेपाशी आहे सुत्र ।

जो विचार मांडायचा आहे तो मांडताना कोणाचेही अंतःकरण दुखावले जाणार नाही याची दक्षता साधकांनी घ्यावी यावर श्री समर्थांचा कटाक्ष असायचा समर्थ म्हणतात -

अपराधी जन चुकतची गेले । तुझा तूची सावरी ।<br>
अंतरासी लागेल ढका । ऐसी वर्तणूक करु नका ।<br>
जेथे तेथे विवेका । प्रगट करी ।।

ही केवढी आर्तता आणि कोमलता आहे पहा.

कोमल वाचे बरोबरच विमल करणीसुद्धा तितकीच महत्वाची आहे. कोमल वाणीने बोलायचे आणि पाठीमागून वार करायचा ही निती असू नये म्हणून प्रत्यक्ष विमल करणी असावी. म्हणजे कोमलतेबरोबर कृती ही तशीच असावी. विमलकरणीसाठी शुद्ध पवित्र कामे करणे आवश्यक असते.

प्रसंग ओळखी दे रे राम । धूर्तकळा मज दे रे राम ।

कुणाच्याही आनंदाच्या किंवा दुःखाच्या प्रसंगी माझ्यात प्रसंगेचितपणा येऊ दे नाहीतर समर्थ म्हणतात -

उदंड विद्या सिकला । प्रसंगमान चुकतची गेला । मग तये विद्येला कोण पुसे ।।

प्रसंग ओळखण्यासाठी धूर्तपणा म्हणजे चातुर्य असलेच पाहिजे. माणसाच्या चेहऱ्यावरुन त्यांच्या अंतःकरणाचा ठाव घेता आला पाहिजे.

हितकारक दे रे राम । जनसुखकारक दे रे राम ।

हे रामा, मला माझं हित समजतं. माझ्याबरोबर माझ्या समाजबांधवांचे हित त्यांनाही समजवता आले पाहिजे. समाज खऱ्या शाश्वत सुखासाठी प्रवृत्त करता येणे आवश्यक आहे. क्षणिक सुखाचे धोके त्याला समजावून देता आले पाहिजेत.

अंतर पारखी दे रे राम । बहूजन मैत्री दे रे राम ।

अंतरंगाची पारख करता आली पाहिजे अंतर्मनाचा विचार जाणता येणे आवश्यक आहे. अंतःकरण कोमल आणि मृदू असेल तरच हे शक्य होते.

'बहूजन मैत्री' हा विचार समर्थांनी चारशे वर्षांपुर्वी समाजासमोर मांडला याची नोंद घेणे आवश्यक आहे. बहूजन समजात डोळ्यासमोर ठेवूनच समर्थांनी म्हंटलं होतं.

नारायण असे विश्वी । त्याची पूजा करीत जावी ।

या कारणे तोषवावी । कोणीतरी काया ।।

प्रत्येक व्यक्तीत ईश्वराचा अंश आहे मग तो कोणत्याही जाती, पंथ, अथवा सांप्रदायाचा असो. हा उदात्त आणि विशाल दृष्टीकोन समर्थांनी मांडला होता.

विद्यावैभव दे रे राम । उदासीनता दे रे राम

उत्तम भाषेचे प्रभुत्व जर आपल्याकडे असेल तर अशा प्रभावी वाणीतून रामकथा ब्रह्मांड भेदून पैलाड नेता येईल. हे स्वप्न निश्चितपणे साकार होईल. समर्थांना वेद, उपनिषद, वेदांत, सिद्धांताचे अथांग ज्ञान होते.

वरील ओळीत उदासीनता याचा अर्थ निष्क्रियता नव्हे. करुणाष्टकात समर्थ म्हणतात :

उदासीन हे वृत्ती जीवी धरावी । अती आदरे सर्व सेवा करावी ।

उदासीनता म्हणजे करुन अकर्ता. कर्म यथासांग करायचे पण त्यात लिप्त व्हायचे नाही. हीच उदासीनता होय.

मागो नेणे दे रे राम । मज न कळे ते दे रे राम ।

रामा तुझी कृपा झाल्यावर काही मागण्याची इच्छाच राहणार नाही. रामेवीण जितूकी आस । तितूकी जाणावी नैराश ।

– असे समर्थांनीच म्हटलेले आहे. रामाशिवाय आणि रामकृपेशिवाय अन्य विचार मनात येऊ नये यासाठी रामा तुझी कृपा असू दे. काय मागावे ते मला कळत नाही. माझ्या कल्याणाचं तूच एक जाणतोस.

तुझी आवडी दे रे राम । दास म्हणे मज दे रे राम ।

अंतःकरणात तुझीच सदैव आवड असू दे हेच आमचं मागणं आहे.

संगीत गायन दे रे राम । आलाप गोडी दे रे राम ।

धात माता दे रे राम । अनेक धाटी दे रे राम ।

संगीत कलेशी संबंधित असणारे हे विषय आहेत. संगीत गायन हा समर्थांचा आवडीचा छंद. धन्य ते गायनी कळा समर्थांची प्रसिद्ध आहे. परमेश्वराच्या जवळ जाण्याचा अगदी जवळचा मार्ग म्हणजे संगीत होय. संगीतामध्ये आलाप असावेत आणि त्या आलापामध्ये गोडवा असावा.

धात म्हणजे काल्पनिक गोष्ट. मात म्हणजे सत्यकथा. रामा तुझ्या कथांना मला काल्पनिक आणि सत्यकथा

यांचीही जोड देता आली पाहिजे.

धाटी म्हणजे काव्याचे विविध प्रकार धाटण्या होय. उदाहरणार्थ आर्या, साकी, दिंडी, जुगलबंदी, बंदिश याचं ज्ञान मला दे.

रसाळ मुद्रा दे रे राम । जाड कथा मज दे रे राम ।

श्रद्धा, भक्ती, प्रेमाने श्रोत्यांना माझ्या वाणीतून/वक्तृत्वातून भक्तीरसात न्हाऊन निघाल्याचा आनंद होण्यासाठी मला रसाळ वाणी दे.

जाडकथा म्हणजे वेदांत, सिद्धांताचे अंग मला माझ्या वाणीतून समजवता यायला हवे, माझ्याकडून तुझी कथा करुन घेशील ती वेद वेदांत सिद्धांत आणि शास्त्रांनी परिपूर्ण असू दे.

दस्तक टाळी दे रे राम । नृत्यकला मज दे रे राम ।

दोन्ही हातांनी टाळी वाजवताना अंतःकरणातील देवभाव जागा होतो. नृत्यकला तर खूप महत्वाची आहे. गायन - वादन या इतर कलांमध्ये भगवंत कार्यरत असतोच पण नृत्य कलेमध्ये भगवतं सर्वांग व्यापून असतो.

प्रबंध सरळी दे रे राम । शब्द मनोहर दे रे राम ।

शब्द प्रबंध मांडताना त्यातील नीटनेटकेपणा / सरळपणा अगदी योग्य शब्दात मांडता यावा. शब्दात माधुर्य तुझ्या कुपेने येऊ दे. कथा कीर्तनाद्वारे हे माधुर्य तुझ्या कृपेने सर्वांपर्यंत पोहचवता यावे.

सावधपण मज दे रे राम । बहूत पाठांतर दे रे राम

समर्थ म्हणतात :

अखंड सावध असावे । दुश्चित कदापि नसावे

किंवा

सावध साक्षेपी आणि दक्ष तयास तात्काळची मोक्ष

ही समर्थवचने समर्थ सावधपणाविषयी किती आग्रही होते हे दाखवतात. व्यवहारातील सावधानता मला माहित असते. परमार्थातील सावधानता तुझ्या कृपेने येऊ दे.

समर्थांचा पाठांतरावर विशेष भर असायचा महंतासाठी पाठांतर सक्तीचे होते. समर्थांचे बहूतेक शिष्य हे एकपाठी होते.

दास म्हणे रे सद्गुणधाम । उत्तम गुण मज दे रे राम ।

दासाची ही मागणी रामा तूच पूर्ण कर आणि मला उत्तमात उत्तम गुणांची भिक्षा दे.

पावन भिक्षा अभेद्य भक्ती, तद्रुपता, अर्थारोहन, सज्जनसंगती, अलिप्तपण, ब्रह्मअनुभव, अनन्यसेवा, मजविण तू मज दे रे राम । दास म्हणे मज दे रे राम ।

ही सर्व पावनभिक्षा तुझ्या अभेद्य भक्तीसाठी हवी आहे. त्यात तद्रुपता म्हणजे अनुसंधान आणि ते ही अर्थ भरलेलं असू दे. सज्जनाच्या संगतीसाठी माझी प्रार्थना आहे. भौतिक नाशिवंत संसारातून अलिप्तपण मला येऊ दे. ब्रह्मत्वाचा अनुभव अनन्यसेवेतून मला प्राप्त होऊ दे. शेवटी माझं अस्तित्व विसरुन तू आणि मी आपल्यातल्या द्वैतभावाचं विसर्जन होऊ दे. हेच दासाचे तुझ्यापाशी मागणे आहे.

**स. भ. श्री. मोहनबुवा रामदासी**

(कार्यकारी अध्यक्ष)

आनंदी - नारायण कृपा न्यास, खातगाव ता. कर्जत जि. नगर. मोबाईलः ९१४६८५५६९१

* युट्युब व फेसबुकवर 'मोहनबुवा रामदासी' या नावाने पेज व चॅनल द्वारे बुवा उपलब्ध आहेत.

# अक्षय्य तृतीया - वैशाख शुद्ध तृतीया

**सौ. स्मिता देशपांडे** (भ्रमणध्वनी : ९४२२५३३६५६)

वैशाख शुद्ध तृतीयेस अक्षय्य तृतीया म्हणतात. हा साडेतीन मुहुर्तांपैकी एक मानतात. (अर्धा मुहुर्त) या दिवशी स्नान, दान, जप, पितरांच्यासाठी अर्पण केले जाते ते अक्षय्य टिकते. असे शास्त्रात सांगितले आहे. त्यामुळे या मुहूर्तावर सोने, वस्त्रे, घर खरेदी करतात. या दिवशी समुद्र खवळण्यास सुरुवात होते. म्हणून खेड्यातील स्त्रिया, लोक 'आखीती' असे म्हणतात. तर काही लोक 'आखाती' म्हणतात.

'चैत्रशुद्ध तृतीयेला' गौरी तीज म्हणतात. या दिवशी पार्वती माहेरी येते व 'वैशाख शुद्ध तृतीयेला' परत सासरी जाते. म्हणून हा सण मोठ्या थाटामाटाने स्त्रिया साजरा करतात. या दिवशी स्त्रिया हळदी-कुंकू करतात व चैत्रगौरीला कैरीचे पन्हे, कैरीची डाळ, पुरणावरणाचा नैवेद्य दाखवून देवीच्या रूपाने सवाष्ण स्त्रीला जेवायला घालतात व गौरीची अशा प्रकारे सासरी पाठवणी केली जाते.

हा साडेतीन मुहुर्तापैकी सण असल्याने कोकणातील काही शेतकरी या दिवशी पेरण्या करतात. या दिवशी सकाळी शूचिर्भूत होऊन किंवा स्नानादि कामे आटोपून पितरांकरीता उन्हाळा सुसह्य व्हावा म्हणून कुंभदान करतात. वाळ्याचा पंखा पितरांना/गुरुजींना/ब्राह्मणास दान देतात. पितराचे श्राद्ध करतात. या दिवशीचे जप, दान, होम इत्यादी केले असता ते पुण्यकारक ठरते. त्यामुळे पितर संतुष्ट होऊन आशीर्वाद देतात. मातीचे दोन घट पाण्याने भरून एकात तांदूळ व दुसऱ्यात तीळ घालून त्यांना दोरा गुंडाळतात व धान्यावर ठेवतात. ब्रह्मा, विष्णू, शिवस्वरूपात त्यांची पूजा करून ब्राह्मणास दान करतात. यामुळे पितर तृप्त होतात आणि मनोरथ पूर्ण होते.

या दिवशी कृतयुगाचा प्रारंभ झाला. त्यामुळे त्यास 'युगादि' असेही म्हणतात. अक्षय्यतृतीया बुधवारी आली व त्याच दिवशी रोहिणी नक्षत्र असेल तर ती महापुण्यकारक समजली जाते. या युगाच्या प्रारंभाचे व वसंतोत्सवाच्या रंगोत्सवाच्या स्वागतासाठी चैत्रशुद्ध तृतीया ते वैशाख शुद्ध तृतीयेपर्यंत एक महिना दारात रांगोळी म्हणजे चैत्रांगण काढले जाते, अंगणात साफसफाई करून सडारांगोळी करतात. रांगोळीच्या ठिकाणी सूर्यमंडळाचे अधिष्ठान असते. रांगोळी म्हणजे लोककलांचा, सौंदर्याचा, मांगल्याचा साक्षात्कार. भारतीय भूमी ही अन्नदात्री आहे, म्हणून तिला सुशोभित करून कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी रांगोळी काढली जाते. यात प्रामुख्याने चंद्र, सूर्य, शंख, चक्र, गदा गोपद्म, स्वस्तिक, कमळ, नारळ या सारख्या प्रतिकांचा, शुभचिन्हांचा वापर करता. वैशाखात सूर्य किरणांची प्रखरता जास्त असते. त्यामुळे उन्हाळा जाणवतो. यामुळे या महिन्यास वैशाख वणवा म्हणतात. त्यामुळे माठातले थंड पाणी पितरांना देतात. विशेषतः देशावर हा सण मोठ्या प्रमाणात पार पडतो.

अक्षय्यतृतीयेला गौरी व्रताची सांगता होते. हा दिस 'परशुरामाचा' जन्मदिवस आहे. परशुाम हा विष्णुचा सहावा अवतार आहे. श्रीविष्णुच्या दशावतारात उत्क्रांतीचे महत्त्व सांगितले आहे. परशुरामांनी पृथ्वी जिंकल्यावर ती कश्यपमुनींना दान केली. त्यांना मग राहण्यासाठी भूमी नसल्याने त्यांनी समुद्र हटवून स्वतःसाठी जागा निर्माण केली, ती म्हणजे सध्याची कोकण प्रदेशाची भूमी आहे. परशुराम हे विद्वान, ज्ञानदाते, क्षमा व शांतीचे उपासक असूनही हातात शस्त्र घेऊन क्षात्रवृत्तीने अन्याय व जुलूमविरोधात त्यांना उभे राहावे लागले. ह्या दिवशी परशुराम जयंतीही साजरी करतात. या दिवशी ग्रीष्म ऋतूत तयार होणाऱ्या सर्व धान्यांचा दानधर्म केल्यास धनाची कमतरता कधीही भासत नाही.

या सणाबाबत एक कथा आहे. पूर्वी शाकळ नावाचे शहर होते. त्या शहरात धर्म नावाचा वाणी होता.

तो एकनिष्ठ व सत्यवचनी होता. तो देव व ब्राह्मणांची नित्यनियमाने पूजा करी, एके दिवशी ब्राह्मणाने त्याला अक्षय्य तृतीयेचे महत्त्व सांगितले, त्याप्रमाणे तयाने नदीवर जाऊन पितरांचे व देवतांचे तर्पण केले. घरी जाऊन उदकाने भरलेले घट व दक्षिणा ब्राह्मणास दिली. हा उपक्रम त्याने दरवर्षी चालू ठेवला. काही वर्षाने भगवंताचे नामस्मरण करता करता तो मृत्यू पावला. त्याचा परिणाम म्हणून पुढील जन्म गतजन्माच्या पुण्याईच्या बळोतर त्याला 'राज्यपद' मिळाले. तरीही त्याने आपला नियम चालू ठेवला. दानधर्म करूनही त्याचा खजिना कधीच रिकामा झाला नाही. कारण त्याने अक्षय्य तृतीयेला पुष्कळ दानधर्म केला होता.

अक्षय्यतृतीयेला 'ब्रह्मा-विष्णू' यांच्या मिश्र लहरी उच्च देवतांच्या लोकातून म्हणजे सगुण लोकातून पृथ्वीतलावर येतात त्यामुळे पृथ्वीवरील सात्त्विकता १० टक्क्यांनी वाढते अशी कल्पना आहे. ह्या दिवशी केलेली पेरणी, वृक्षारोपण औषधी वनस्पती, धान्याची पेरणी अक्षय फळ देते. या दिवशी सतत कृपादृष्टी ठेवणाऱ्या गृत्तिकेमुळे आपणास धान्यलक्ष्मी, धनलक्ष्मी, वैभवलक्ष्मी प्राप्त होते. त्यामुळे जमिनीची पूजाही शेतकरी करतात.

अक्षय्य तृतीया ही लिंगायत समाजाचे धर्मगुरू महात्मा बसवेश्वर यांचाही जन्मदिन होता. अनेक सिद्ध पुरुषांपैकी ते एक होते. कर्नाटकातील बागेवाडी शैव ब्राह्मण कुटुंबात इ. स. ११०५ मध्ये अक्षय्य तृतीयेच्या दिवशी त्यांचा जन्म झाला. हा दिवस म्हणजे 'दिव्यत्वाची जेथे प्रचिती तेथे कर माझे जुळती' या शब्दात त्यांना अभिवादन होय. त्यांनी मौजीबंधन नाकारून कुडलसंगम येथे १२ वर्षे तपश्चर्या केली. ज्ञान-वेदमुनींच्या मार्गदर्शनासाठी विद्यार्जन करून वेद, उपनिषद, श्रुती, पुराणे, रामायण, महाभारत, इत्यादिंचा अभ्यास व चिंतन केले. बसवेश्वरांचे विचार समग्र स्वरूपाचे असून त्यांनी राजकारण, अर्थकारण, सामाजिक समता, बंधुत्व या गोष्टी स्वअनुनायांमार्फत आचरणात आणल्या. महात्मा बसवेश्वरांनी वर्गविहीत व शोषणविहीत, समाजाधिष्ठित न्याय व्यवस्था निर्माण केली पाहिजे असे आग्रहपूर्वक सांगितले. त्यांनी काया-वाचा-मनाने आपला जीवनमार्ग सफलतापूर्वक संपन्न केला.

## नशिबाचा स्विकार

**डॉ. लक्ष्मीकांत दाणी** (भ्रमणध्वनी : ९८२०४३७०७३)

आपल्या आयुष्यात घडून गेलेली प्रत्येक गोष्ट मग ती वाईट असली, नुकसान करणारी असली तरीही ती तशी घडणे आवश्यक आहे. अशा दृष्टिकोनातून ती गोष्ट 'स्विकारणे'. ती गोष्ट आवडली नाही तरीही ती स्विकारणे. अगदी मझेनय तत्वज्ञानात सांगितलेल्या शांततेने, प्रसन्नतेने स्विकारणे.

थॉमस एडिसन जेवत होता. तेवढ्यात एक माणूस धावत आला. त्याने वाईट बातमी आणली होती. एडिसनच्या प्रयोगशाळेला आग लागली होती. एडिसनने त्याला कसा प्रतिसाद दिला असेल असे वाटते?

''अरे देवा, काय हे... माझं नशिबच फुटकं... माझी सगळी मेहनत वाया गेली...'' अशी?

की त्याने खूप चिडून, बिथरून, आरडाओरड केली असेल?

पण यापैकी काहीच घडलं नाही. एडिसनने आपल्या मुलाला हाक मारली आणि म्हणाला ''अरे तुझ्या आईला आधी बोलाव, तिला अशी आग परत पहायला मिळणार नाही.''

स्वाभाविकपणे मुलाला हेच वाटले की आपल्या बापाचे डोके फिरले, वेडा झाला बाबा. आजवर केलेली सर्व मेहनत आगीत भस्मसात होत होती आणि एडिसन शांत होता. तो शांतपणे म्हणाला ''आग लागली हे

बर झालं माझ्या सगळ्या चुका आणि इतर अनावश्यक गोष्टी जळून गेल्या.''

''आपल्या आयुष्यात घडून गेलेल्या गोष्टी खऱ्या स्वरुपात आनंदाने स्विकारणे'' म्हणजे नशिबाचा स्विकार.

६७ वर्षाचा एडिसन विमनस्क, हताश, उदास काहीच न होता नव्या उत्साहाने कामाला लागला. आगीत भस्मसात झालेली संपत्ती त्याने दसपटीने परत मिळवली.

मी या कल्पनेच्या प्रेमातच पडलोय. का माहितेय? कारण आपलं ''नशिब स्विकारण्यातली'' ताकद मला समजलीय. यात अक्षरशः एवढी प्रचंड ताकद आहे की आपल्याला काहीच अशक्य वाटत नाही. प्रत्येक गोष्ट होण्यामागे काही कारण असतं आणि ती गोष्ट ''सकारात्मकतेने स्विकारणे'' हे तुमच्या हातात असते.

कदाचित तुमचा जॉब गेला असेल,

कदाचित तुमची आयुष्यभराची कमाई कोणी लुबाडली असेल,

कदाचित तुमच्या सर्वात प्रिय व्यक्तिला असाध्य रोग झाला असेल,

कदाचित तुम्हाला कोणी अत्यंत वाईट वागणुक दिली असेल,

कदाचित आयुष्याने तुमच्यासमोर असे आव्हान उभे केले असेल ज्यातून तुमची सुटका नाही,

तुम्ही हे सगळं हसत स्विकारता आणि त्यातूनच नव्या उर्जेने पुढे जाता याला ममनशिबाचा स्विकारयय म्हणतात.

तुमच्या बाबतीत अशा गोष्टी घडल्याच तर तेव्हा तुम्हाला ओके किंवा चांगल वाटावं हा या लेखाचा उद्देश नाही. काहीही घडलं तरी तुम्हाला ते ग्रेट वाटावं आणि तुम्ही ते हसत स्विकारावं हा उद्देश आहे.

जर ते घडलं तर ते घडणारच होतं आणि त्यातून तुम्ही स्वतःचा फायदा करून घ्यावा हा आहे.

एखादी आपत्ती आली असतांना शांत रहाणं हे अनैसर्गिक वाटतं. पण तेव्हा शांत रहा.

जेव्हा आपल्याला हरल्यासारखं वाटेल तेव्हा ते शांत रहाणंच जोमाने प्रवास करण्यासाठी नविन उर्जा देणारं ठरेल.

बस आता, झालं तेवढं खुप झालं अस वाटेल तेव्हा ते शांत रहाणं नवं इंधन देणार ठरेल.

सगळं विपरित घडत असतांना ते शांत रहाणं 'थिंक बिग' सांगणारं ठरेल.

हताशा आली असतांना ते शांत रहाणं तुमच्या चेहऱ्यावर हसू उमटवणारं ठरेल.

कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीवर यशस्वी रित्या मात करणे म्हणजेच ''नशिबाचा स्विकार'' करणे होय.

## महिला हिंसाचाराचे लॉकडाऊन कधी?

**डॉ. तरुजा भोसले– वळसंगकर** (भ्रमणध्वनी : ९५६१०९३८३८)

### लेख क्र. १

आज या विषयावर तुमच्याशी संवाद साधायचा आहे. खरं तर मीच बोलणार आहे; त्यामुळे याला संवाद म्हणता येणार नाही. पण 'ये हृदयीचे ते हृदयी घातले' असं मानलं तर हा संवादच!

सावित्रीबाईंनी स्त्री उद्धारासाठी काय सोसले ते सर्वज्ञात आहे.त्याचा चांगला परिणामही दिसतो आहे. कुटुंबाला हातभार लावणारी स्त्री अनेक पातळीवर झाशीची राणी झालेली दिसते.पण ८ मार्चला तिच्यावर

स्तुतीसुमने उधळून तिचा गौरव करणारे लोक एक उपक्रम म्हणून ८ मार्च साजरा करत असतात का ? हा प्रश्न निर्माण व्हावा अशी वस्तुस्थिती आहे.गेली ३४ वर्षे मी महिलांचे प्रश्न सोडवून कौटुंबिक सौहार्द टिकवण्याचे काम करत आहे. मी जे पहाते आहे ते विदारक आहे.

एक काळ असा होता की स्त्री उंबऱ्याच्या आत होती. बाहेरचं जग तिला अनिभज्ञ होतं. त्या जगाचं तिला कुतूहल होतं; पण समाजमर्यादाच्या बंधनांनी तिची पावलं जखडली होती. म. कर्वे, ज्योतीबा फुले, सवित्रीबाईंच्या विचारांचा आदर्श मानून अनेकांनी स्त्री शिक्षणात पुढाकार घेतला आणि तिच्या समोरील उंबऱ्याचा अडसर दूर झाला.समाजाची पन्नास टक्के शक्ती जर घरात बसली तर देश प्रगतीपथावर जाणार नाही. गाडीची दोन्ही चाकं एका गतीत असतील तरच तो प्रवास सुखाचा हे विचारवंतांनी समाजाला पटवून दिलं.आणि स्त्रीला आभाळ मिळालं.

स्वप्न पूर्ण झालं.

प्रगतीचे पंख लाभले.

झेप घेण्याची उमेद बळावली.

तिनं मोकळा श्वास घेतला.

खरंच तिनं मोकळा श्वास घेतला ?

की तिचा श्वास घुसमटला ?

आपण या आकडेवारीवर नजर टाकू -

लॉकडाऊनच्या काळात राज्य महिला आयोगाकडे आतापर्यंत राज्यभरातून एकूण एक हजार ३०४ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. यामध्ये कौटुंबिक वाद व शारीरिक अत्याचाराच्या ३९७ तक्रारी आल्या असून यात तब्बल ३८९ प्रकरणात कारवाई करण्यात आली आहे. महिलांच्या सामाजिक समस्यांबाबत ३७६ तक्रारी राज्य महिला आयोगाकडे आल्या असून यात ३६८ तक्रारींवर कारवाई झाली आहे.

संपत्ती विषयी ९९ तक्रारी दाखल झाल्या आहेत. यामधील ९२ प्रकरणं निकालात काढली आहेत. कामाच्या ठिकाणी महिलांवर लैंगिक अत्याचाराच्या ३३ तक्रारी आल्या असून राज्य महिला आयोगाने यातील २९ प्रकरणांत कारवाई केलीय.

कामाच्या ठिकाणी १०८ महिलांनी छळ होत असल्याचे सांगितले. या संबंधी दाखल करण्यात आलेल्या तक्रारींमध्ये १०२ प्रकरणे निकाली काढली आहेत. राज्य महिला आयोगाकडे यासोबतच २९१ विविध प्रकरणातील तक्रारी दाखल झाल्या आहेत. यात २८३ प्रकरणात राज्य महिला आयोगाने कारवाई केली आहे.

एनसीआरबीच्या अहवालात २०१९ सालात महिलांसंदर्भातील सर्व गुन्ह्यांबाबत देशातील विविध शहरांची आकडेवारी जाहीर झाली असून यात देशाची आर्थिक राजधानी मुंबई देशात दोन क्रमांकावर आहे. महिलांवरील अत्याचारांच्या घटनेत दिल्ली पहिल्या क्रमांकावर असून दुसऱ्या स्थानी मुंबई, तिसऱ्या क्रमांकावर बंगळूरू शहर आहे.

दिल्ली - १२ हजार ९०२, मुंबई - ६ हजार ५१९, बेंगळूरू - ३ हजार ४८६, जयपूर - ३ हजार ४१७, हैदराबाद - २ हजार ७५५

वर्ष २०१९ एनसीआरबीच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र राज्य महिलांच्या सर्व गुन्ह्यांत देशात टॉप - ५ वर आहे.

**बलात्कार करून हत्या**

महाराष्ट्र ४७, मध्य प्रदेश ३७, उत्तर प्रदेश ३४, आसाम २६, कर्नाटक २३

**ॲसिड हल्ला संदर्भातील राज्यातील गुन्हे**

उत्तर प्रदेश ४२, पश्चिम बंगाल ३६, मध्य प्रदेश ८, बिहार ७, महाराष्ट्र / आसाम ६

**महिलांचे अपहरण करून हत्या झालेले गुन्हे**

उत्तर प्रदेश ११ हजार ६४९, बिहार ९ हजार ०२५, आसाम ६ हजार ९८९, महाराष्ट्र ६ हजार ९०६, मध्यप्रदेश ६ हजार ०९१

**महिलांची तस्करी (ह्युमन ट्रॅफिकिंग) संदर्भातील गुन्हे**

महाराष्ट्र २२०, आसाम १५३, केरळ १००, ओडिसा ७९, आंध्रप्रदेश ६९

**बलात्कार संदर्भातील गुन्हे**

राजस्थान ५ हजार ९९७, उत्तर प्रदेश ३ हजार ०६५, मध्य प्रदेश २ हजार ४८५, महाराष्ट्र २ हजार २९९, आसाम १ हजार ७७३

**महिलांची सायबर फसवणूक संदर्भातील गुन्हे**

ओडीशा ३९०, आसाम ३२९, उत्तर प्रदेश २१०, महाराष्ट्र ८६, कर्नाटक ७३

**महिलां संदर्भातील सर्व गुन्ह्यांबाबतची**

उत्तर प्रदेश ५६ हजार ०११, महाराष्ट्र ३१ हजार ९७९, पश्चिम बंगाल ३० हजार ९९२, मध्य प्रदेश २९ हजार ७८८, राजस्थान २५ हजार ९९३

ही आकडेवारी अस्वस्थ करणारी आहे . समाजातील विचारवंत, परिवर्तनवादी, शिक्षणक्षेत्रातील मान्यवरांनी याचे उत्तर शोधले पाहिजे. त्याची कठोर अंमलबजावणी केली पाहिजे.तेव्हाच महिला हिंसाचाराचे लॉलडाऊन होईल.

## रिझर्व्ह बँकेचे पतधोरण आणि डिजिटल बँक

**उदय तारदाळकर, मुंबई (मो. ९९२०८०५८२२)**

सर्वसाधारणपणे देशाच्या विकासाचा दर आणि त्यामागची धोरणे ठरविणे हे सरकारचे काम असते. त्या अनुषंगाने मध्यवर्ती बँक ही देशातील महागाई आणि त्यानुसार व्याज दर निश्चित करत असते. सध्याच्या धोरणाप्रमाणे रिझर्व बँकेची पतधोरण समिती (MPC) दर दोन महिन्यांनी देशातील चलन विषयक परिस्थिती, महागाई निदेर्शांक आणि सरकारला लागणारी कर्जे ह्या गोष्टीचा विचार करून आपले धोरण ठरवीत असते. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर जगातल्या सर्वच मध्यवर्ती बँकांनी मवाळ किंवा सरकारला अनुकूल असे धोरण स्वीकारले. प्रत्येक देशाला आर्थिकदृष्ट्या तग धरण्यासाठी ह्याची निकड होती ह्यात काहीच शंका नाही. भारतात सुद्धा रिझर्व्ह बँकेने तसेच मवाळ धोरण स्वीकारून आणि विक्रमी कमी व्याजदरात कर्जे उभारून सरकारच्या धोरणाशी सुसंगत अशी भरीव कामगिरी केली. त्याचे श्रेय अर्थातच रिझर्व बँकेचे मितभाषी गव्हर्नर श्री शक्तिकांत दास आणि त्यांच्या सहकाऱ्यांना जाते.

मध्यवर्ती बॅन्क आणि केंद्र सरकार ह्यांच्यातील संघर्ष हा बारमाही ऋतूसारखा आहे. ह्या संघर्षाच्या ठिणग्या बहुतांशी बंदिस्त खोलीत उडत असतात. माजी डेप्युटी गव्हर्नर विरल आचार्य यांनी काही वर्षांपूर्वी मध्यवर्ती बँकेच्या स्वायत्ततेसंबंधीचा मुद्दा उपस्थित करून केंद्र सरकारने रिझर्व्ह बँकेच्या कामात ढवळाढवळ करणं हे विनाशकारी ठरू शकतं असे वक्तव्य केले होते. रिझर्व्ह बँकेच्या स्वातंत्र्याचा सन्मान न केल्यास सरकारवर

लवकरच आर्थिक बाजारपेठेचा क्रोध उफाळेल असे नमूद करून केंद्र सरकार हे पाच वर्षाच्या कालावधीसाठी असते पण रिझर्व्ह बँक ही कालातीत आहे असेही श्री आचार्य म्हणाले होते. परंतु कायद्याने हमी दिलेली स्वायत्तता आणि धोरणात्मक निर्णय ह्यांची सांगड घालताना गंभीर विषयांवर मतभेद असल्यास सरकारचे सार्वभौमत्व स्वीकारणे जरूरीचे आहे. सध्याच्या सरकारने आणि रिझर्व बँकेने हेच सिद्ध केलेआणि भारताला कोणत्याही आर्थिक उद्रेकाचा सामना करावा लागला नाही.

असामान्य परिस्थितीमुळे घेतलेल्या कर्जाचा परिणाम चलनवाढीत (वित्तीय तूट) आणि पर्यायाने महागाई निर्देशांक वाढण्यात झाला. भारतात महागाईने गेल्या आठ वर्षाची पातळी पार केली. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने आपले द्वैमासिक पतधोरण जाहीर करताना व्याजदरांमध्ये कोणताही बदल केला नाही. आंतरराष्ट्रीय बाजारात वाढलेल्या कच्च्या तेलाच्या किंमती, युक्रेन-रशिया युद्धामुळे सध्याची अस्थिरता, राज्यांकडून होणारी खर्चातील वाढ त्याचप्रमाणे खाद्य उत्पादनांच्या वाढत्या किमती, ह्यामुळे ह्यावेळी जाहीर होणा-या पतधोरणात व्याजदरात बदल होणार असा अंदाज वर्तवला जात होता. पण आश्चर्य म्हणजे द्विमासिक आढावा घेताना व्याजदर जैसे थे ठेवले. महागाई निर्देशांक हा बँकेने स्वतःच घातलेल्या ४ ते ६ टक्क्याच्या पट्ट्याच्या पार जाऊन सुद्धा असा निर्णय घेतला हे थोडे खटकले. गव्हर्नर श्री दास म्हणाले की २०२२-२३ मध्ये महागाई निर्देशांक एप्रिल-जूनमध्ये सरासरी ६.३% आणि जुलै-सप्टेंबरमध्ये ५.८% अपेक्षित आहे. रिझर्व बँकेची काही निरीक्षणे आणि प्रत्यक्षात कृती ह्याचा लेखाजोखा केल्यास असे दिसते की एका बाजूने रिझर्व्ह बँक आपले महागाई बद्दलचे धोरण विशद करताना देशाच्या विकास दराचा अंदाज व्यक्त करताना तो आता ७.२% टक्के राहील असे जाहीर केले. सर्व साधारणपणे सर्वेक्षण करताना धोरणात्मक निर्णय घेण्यास सद्यस्थितीत रिझर्व्ह बँकेने कुंपणावर राहण्याचे पसंत केले आहे असे वाटते.

पतधोरणाबरोबरच रिझर्व बँकेने एक महत्वाचे पाऊल उचलले. रिझर्व बँकेने डिजिटल बँकिंग युनिट्सच्या स्थापनेसाठी एक परिपत्रक जाहीर केले ते त्वरित अमलात येत आहे. या परिपत्रकानुसार बँकांना आपल्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये पुनरावलोकन करून डिजिटल वापरासाठी एक धोरण आखावे लागेल.

पुढील बारा ते चोवीस महिन्यात रिझर्व बँक डिजिटल बँकिंग परवाने जारी करणार आहे. त्यासाठी बँकांनी आवश्यक ती तयारी करणे जरुरीचे आहे. रिझर्व बँकेच्या आदेशानुसार बँकांनी पुढील काही वर्षांमध्ये डिजिटल व्यवसाय हा किमान ५० टक्के व्हावा असा उद्देश ठेवणे क्रमप्राप्त आहे. आपल्याला माहिती आहे की २०१६ च्या नोटबंदीनंतर मोठ्या प्रमाणात डिजिटल व्यवहार सुरू झाले आणि अर्थातच कोरोनाच्या महामारीच्या काळात ते एक वरदान ठरले. भारतात आता विक्रमी डिजिटल व्यवहार होतात. त्या अनुषंगाने बँकांना किरकोळ ग्राहक आणि लघु आणि मध्यम व्यवसायासाठी संपूर्णपणे डिजिटल व्यवहार करणे हे कर्मप्राप्त होईल. परंपरागत बँकांवर याचा मोठा प्रभाव पडेल कारण त्या अजूनही सेवा देण्यासाठी या क्षेत्राकडे योग्य त्या गांभीर्याने पाहत नाहीत .हे सर्व करण्यासाठी बँकेला सीईओ स्तरावर या विभागाचे व्यवस्थापन करण्यासाठी वरिष्ठ नेतृत्वाची नियुक्ती करावी लागेल. स्टेट बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक ह्या मोठ्या बँक किंवा सहकारी क्षेत्रातील अग्रगण्य बँक सारस्वत बँक या बँक उत्तमपणे तंत्रज्ञान वापरून ग्राहकांना सेवा देत आहेत.

आपले तंत्रज्ञान अमुक एक सेवा देण्यास असमर्थ आहे अशी कोणतीही सबब बँक व्यवस्थापनाला देता येणार नाही. त्यामुळे बँकेला त्यासाठी सर्वतोपरी आपल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन आणि मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणूक करून हे सगळ करावे लागेल. अशी सेवा बँक कंत्राटी पद्धतीने माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांना देऊ शकेल, त्यामुळे माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्राला ह्या निर्णयामुळे उभारी मिळेल ह्यात काहीच शंका नाही.

# ऋग्वेद भूषण - श्री प्रवीण दीक्षित



श्री. प्रवीण नारायण दीक्षित भारतीय पोलिस सेवेतील एक असाधारण व्यक्तिमत्व. महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालक या जबाबदारीच्या व सर्वोच्च पदावरून सेवानिवृत्त झाले.

श्री. प्रवीण दीक्षित यांचा जन्म पुण्यात झाला. त्यांचे शालेय शिक्षण पुण्यातील मॉडर्न स्कुल येथे झाले. संस्कृत या विषयात बिडकर शिष्यवृत्ती प्राप्त झाली होती. महाविद्यालयीन शिक्षण पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये पॉलिटिकल सायन्स या विषय घेऊन पदवी शिक्षण पूर्ण केले. पुढे पदवीत्तोर शिक्षणासाठी दिल्ली येथील जे एन यु' या नामांकित विद्यापीठातुन त्यांनी MA- ची पदवी धारण केली. सन १९७७ मध्ये इंडियन पोलिस सर्व्हिसेस (IPS) मध्ये प्रथम प्रयत्नातच निवड होऊन सुपरीटेंडेंट ऑफ पोलीस या पदावर रायगड येथे रुजू झाले आणि येथून पोलीस दलाच्या 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीदवाक्याला न्याय देत त्यांची भारतीय पोलिस सेवेतील घोडदौड सुरू झाली.

प्रवीण दीक्षित यांनी पोलीस दलातील अनेक महत्वाची व जबाबदारीची पदे भूषविली आहेत. त्यांनी त्यांच्या अधिकारात कल्पकतेने अनेक नवनविन योजना राबवून पोलीस दलाची कार्यक्षमता वाढविली आहे. पोलीसदल अत्याधुनिक करण्यासाठी त्यांनी विविध ॲप्स सुरू केली. ज्यामुळे महिला, बालके, वृद्ध यांची सुरक्षा सुकर झाली. पुण्यातील स्वा. सावरकर स्मारकाने त्यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केले आहे.

महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक म्हणून काम करत असतांना राष्ट्रीय सुरक्षा बळकट होण्यासाठी त्यांनी विविध अंगांनी मोठे प्रयत्न केले. पोलीस अधिकारी, कर्मचारी यांचे मनोबल उंचावून पोलीस व नागरिक ह्यांच्यामधे विश्वासाचे वातावरण निर्माण केले. पोलीसांच्या शिवाय प्रत्येक नागरिकानेही सुरक्षा सैनिक बनावे या दृष्टीने त्यांनी 'पोलीस मित्र' ही अभिनव योजना राबवली व संपूर्ण राज्यातून ५ लाख पेक्षा अधिक सर्व धर्माचे, सर्व वयाचे स्त्री पुरुष ह्या योजनेत सामील होऊन त्यांनी राष्ट्रीय सुरक्षेसाठी आपले योगदान दिले.

प्रवीण दीक्षित हे अँटिकरप्शनचे महासंचालक असतांना भ्रष्टाचाराविरुद्ध त्यांनी प्रखर मोहीम राबवली व शासनाच्या विविध विभागातील २५०० हून अधिक अधिकार्यांवर कठोर कारवाई केली. १०६४ हा टोल फ्री नंबर राबवून त्यांनी नागरीकांना उत्तम सुविधा उपलब्ध करून दिली. ते पोलीस गृहनिर्माण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक असतांना त्यांनी पोलीस अधिकार्यांची कार्यालये व निवासस्थाने मोठ्याप्रमाणामधे बांधून पूर्ण केली. त्यामधे पोलीस आयुक्त मुंबई यांचे नवीन कार्यालय, दहशतवाद विरोधी कारवाई करणाऱ्या फोर्स वन साठी लागणाऱ्या सर्व इमारती व महाराष्ट्राच्या अनेक भागात ३००० निवासस्थाने बांधली.

प्रवीण दीक्षित हे गृह विभागामधे कायदा व सुव्यवस्था ह्याचे प्रमुख होते व तिथे त्यांनी प्रधान सचिव म्हणून काम करत असतांना विविध विभागांमधे सुसूत्रता आणली. सेवानिवृत्ती नंतर माननीय राष्ट्रपतींनी दीक्षित यांची महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण येथे उपाध्यक्ष म्हणून नेमणूक केली. त्यात अनेक शासकीय अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यात त्यांचे मोलाचे योगदान होते. प्रशासनातील दीक्षित यांचे विशेष योगदान लक्षात घेऊन माननीय राष्ट्रपतींनी त्यांचा उत्तम सेवा पदक व विशेष सेवा पदक देऊन दोनदा गौरव केला आहे. प्रवीण दीक्षित यांना महाराष्ट्र, देशपातळीवर व आंतर् राष्ट्रीय पातळीवर जबाबदारीच्या ठिकाणी काम करण्याचा ४४ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, चोख व पारदर्शी प्रशासन व सर्व लोकांना बरोबर घेऊन काम करणे हे प्रवीण दीक्षित ह्यांचे विशेष गुण आहेत.

डिसेंबर २०२१ मधे प्रवीण दीक्षित यांची स्वा. सावरकर राष्ट्रीय स्मारक मुंबई चे अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे . स्वा. सावरकर ह्यांचे लिखाण, विचार नवी पिढीपर्यंत पोचावेत ह्यासाठी ते कार्यरत आहेत. प्रवीण दीक्षित ह्यांच्या सुविद्य पत्नी सौ अरुंधती दीक्षित ह्यांनी ८५ संस्कृत स्तोत्राचा मराठीत भावानुवाद केलेला आहे. अनुवाद पारिजात, अनुवाद चंपक, नाते लडाखशी, मॉरिशसच्या अंतरंगात ही लोकप्रिय पुस्तके आहेत. प्रवीण दीक्षित यांचे विविध विषयावरील लिखाण, मुलाखती www. praveendixit.com ह्या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. अरुंधती दीक्षित ह्यांचे लिखाण www. anuvadparijat.blogspot.com वर उपलब्ध आहे. श्री. प्रवीण दीक्षित यांच्या कार्याचा चढता आलेख पाहून उर अभिमानाने भरून येतो. प्रवीण दीक्षित यांच्या आजपर्यंतच्या कर्तबगारीला सलाम.

**शब्दांकन : मिलिंद सरदेशमुख**

## भावपूर्ण श्रद्धांजली

१) अखिल देशस्थ ऋग्वेदी बाह्मण मध्यवर्ती मंडळ परिषद सदस्य, देशस्थ ऋग्वेदी बाह्मण समाज मंडळ औरंगाबादचे अध्यक्ष, अ.भा. ब्राह्मण महासंघाचे माजी उपाध्यक्ष, 'नाते मनाचे' या विवाह संस्थेचे संचालक **श्री. शंतनू बाळकृष्ण चौधरी** (वय ४६) यांचे मंगळवार दिनांक १९-४-२०२२ रोजी सायंकाळी हृदयविकाराने निधन झाले.

२) अखिल देशस्थ ऋग्वेदी बाह्मण मध्यवर्ती मंडळाचे सभासद श्री. दत्ता आराध्ये यांचे वडील **श्री. पांडुरंग ज्ञानेश्वर आराध्ये** यांचे वयाच्या ९३व्या वर्षी पंढरपूर येथे वृद्धापकाळाने निधन झाले.

३) जेष्ठ सभासद **सौ. मंगल खळदकर** यांचे दि २९-०३-२०२२ रोजी दुःखद निधन, भावपूर्ण श्रद्धांजली!

## जोडीदार निवडा

**वर पाहिजे....................................................................................................**

● नाव - **डॉ. सिद्धी अनिल आराध्ये,** जन्मतारीख - १३.१२.१९९५, ब्राह्मण पोट शाखा, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, जन्मवेळ - सकाळी ७.३५, राशी - सिंह, गण - राक्षस, नाडी - अत्यं, चरण - पहिले, शिक्षण - बी.डी.एस., नक्षत्र - मघा, योनी - उंदीर, गोत्र - भारद्वाज, उंची - ५ फूट ५ इंच. अपेक्षा - अनुरूप, वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी शाखेतील असावा. पत्ता - अनिल गोपाळराव आराध्ये : घर नं. ४६१४, १-अ गाताडे प्लॉट जुना कराड नाका मागे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर, संपर्क - ७३५०२९४७८९/८७६६५४१७१२

● नाव - **कु. स्नेहा धनंजय लोहोगावकर,** ब्राह्मण पोटशाखा - देशस्थ ऋग्वेदी, शाकाहारी, जन्मतारीख - १७.०३.१९८९, वय ३३ वर्ण - गोरा सडपातळ, रास - कर्क, नक्षत्र - पुष्यचरण १ नाडी - मध्य, उंची -५.१, शिक्षण - सी. एस. एल. एल. बी. (C. S. LLB), नोकरी - खाजगी कंपनीत C. S. मुंबई मध्ये. आई वडील सेवानिवृत्त आहेत. १ भाऊ B.Sc / MBA असून मुबईत नोकरी करीत आहे. अपेक्षा - उच्चशिक्षित, सुसंस्कृत, शाकाहारी, निर्व्यसनी, अनुरूप. अधिक माहितीसाठी संपर्क - आई सौ. मधुरा ध. लोहोगावकर, मोबाईल नं. ९८६९०३९४६६

**वधू पाहिजे....................................................................................................**

● नाव - **सौरभ धनंजय लोहोगावकर,** ब्राह्मण पोटशाखा - देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख - २६.०४.१९८४, गोत्र - अत्री, उंची ५.४, शिक्षण - बीएससी, एम.बी.ए. जन्मवेळ - रात्री ९.१३, जन्मस्थळ - पुणे, अपेक्षा - शाकाहारी, ग्रॅज्युएट, नोकरी करणारी, संपर्क - सौ. मधुरा लोहोगावकर मो. नं. ९८६९०३९४४६, पत्ता - फ्लॅ नं. ५०३, श्रद्धादीप को. ऑ. हौ. सो. जयानगर, दत्तपाडा, बोरिवली (पूर्व), मुंबई - ४०० ०६६

MRH

**Mukund R. Hulyalkar**

painttech CONSULTANTS

**Generations Technology** **Changes BUT** **HULYALKAR SAME**

Visits :

**By Appointment Only**

Available on Phone

9.00 a.m. to 6.00 p.m. (For Local)

10.30 p.m. to 11.30 p.m. (For Outstation)

**Acrylic Distemper 2 Zinc Silicate**

**Complete Paint World**

**"Choice of Bright People"**

## Mukund R. Hulyalkar - Paint Technologist

| | | |
|---|---|---|
| President | : | Deshastha Rugvedi Brahman Sangh, Dadar |
| I. P. President | : | Colour Society U.D.C.T. Mumbai |
| Secretary | : | Karnataka Progressive Education Society, Mahim, Mumbai |
| Convener | : | ISSPA Central Committee |
| Secretary | : | Govindashram Co-Op. Hsg. Society |
| Patron Member | : | Winner's Circle - Thane |
| Member | : | BIS Committee CHD 20, New Delhi |
| Award | : | Udyogshree By Maharashtra State Government / ISSP Mitra |

Govindashram, (Near Hari Niwas), 224, L. J. Road, Dadar, Mumbai 400 028.
Mobile : 9821099494, Tel. : 022-24456214, Fax : 022-24314865
E-mail : painttech_con@yahoo.com, Website : www.painttechconsultants.com







# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

**अद्यावत नूतनीकरण केलेली सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर – माहीम विभागातील**

## खालील मंगल कार्यालये

– तळमजल्यावरील कै. राघाबाई कब्बूर वातानुकूलीत सर्व अद्यावत सोयीयुक्त सभागृह

– दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह.

## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

**लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई – ४०० ०१६.**

**दूरध्वनी : २४३०२२७३/२४३०७५७६ Email : aadrbm@gmail.com**

**R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.




मुद्रक, प्रकाशक आणि संपादक **श्री. प्रभाकर अनंत संत** यांनी **अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळा**च्या वतीने गुरुकृपा, शॉप नं. ३, रोझरी बिल्डिंग, एम.एम.सी मार्ग, माहीम (पश्चिम), ४०० ०१६, येथे छापून **अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ,** लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहिम, मुंबई - ४०० ०१६ येथून अंक प्रकाशित केला. संपादक **श्री. प्रभाकर अनंत संत**